RNI No. MAHBIL /2009/35527
Reg. No. MH/MR/South-343/2014–16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष ६, अंक ११] गुरुवार, एप्रिल १०, २०१४/चैत्र २०, शके १९३६ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ३३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या पनवेल, महाराष्ट्र येथील सेवाक्षेत्रविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ] विनियम, २०१४.**

### अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३.**

**क्र. मविनिआ/तांत्रिक/ परवाना अटी/इक्सोरा/२०१४/०९५.**— विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) मधील अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालील विनियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.**—(१) या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या पनवेल, महाराष्ट्र येथील सेवाक्षेत्रविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ] विनियम, २०१४" असे म्हणावे ;

(२) हे विनियम भारत सरकारच्या, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली, यांच्या दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ च्या एसइझेड अधिसूचना क्र. एस.ओ. ५१४(इ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी लागू राहतील ;

(३) हे विनियम **शासकीय राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या .**—या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

२.१. (ए) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) ;

(बी) **"सह विकासक"** चा अर्थ, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (एफ) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील ;

(सी) **"विकासक"** चा अर्थ, वेळोवेळी अंमलात असलेल्या, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (जी) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील ;

(डी) **"मानीव वितरण परवानाधारक"** म्हणजे ' सह विकासक ' म्हणजेच मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दिनांक ३ मार्च, २०१० च्या अधिसूचना क्र. एसओ ५२८(इ) द्वारा अधिनियमाच्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत, एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे ;

(इ) **"सर्वसाधारण अटी"** म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी ;

(एफ) **"आयसीपीएल"** म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत दिनांक २४ जुलै, २००६ रोजी नोंदणी झालेली आणि भारत सरकारच्या वाणिज्यिक मंत्रालयातील विशेष आर्थिक क्षेत्र वाणिज्यिक विभाग, यांनी दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेल्या पत्र क्र. एफ. २/२८४/२००६-इपीझेड अन्वये सह विकासक म्हणून मान्यता दिलेली मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रा. लि. ;

(जी) **"बहुविध सेवांसाठी विशेष आर्थिक क्षेत्र"** म्हणजे जेथे व्यापार आणि वखार यांसह दोन किंवा अधिक क्षेत्रांत किंवा त्यांच्या कोणत्याही संयोगात सेवा देण्याकरिता एकापेक्षा अधिक क्षेत्रांमध्ये युनिटस् स्थापन करता येतील, असे विशेष आर्थिक क्षेत्र ;

(एच) **"एसइझेड नियम"** म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेले विशेष आर्थिक क्षेत्र नियम, २००६ ;

(आय) **"एसइझेड अधिनियम"** म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (अधिनियम २००५ चा २८).

२.२. (अ) या विनियमांत वापरलेल्या आणि ज्यांच्या व्याख्या करण्यात आलेली नाही अशा सर्व शब्द आणि उक्तींना विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांत नमूद केल्यानुसार अर्थ राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

३. **व्याप्ती.—**मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (आयसीपीएल) च्या संबंधातील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केलेल्या वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी या आयसीपीएलच्या वीज वितरण परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि त्या येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये त्यांच्या विजेचे वितरण आणि किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

४. **"वितरणाचे क्षेत्र" किंवा "पुरवठ्याचे क्षेत्र".—** ४.१ मानीव वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत केलेले क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, यांनी विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या उप-कलम (१) अंतर्गत, दिनांक १९ फेब्रुवारी २००९ रोजी एस.ओ. ५१४ (इ) अन्वये निर्गमित केलेल्या एसइझेड अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सदर अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबी यांच्या अधीन राहून, संपूर्ण क्षेत्र राहील. सदर क्षेत्र पुरवठ्याच्या क्षेत्राच्या नकाशामध्ये (अनुसूची १ मध्ये नकाशा जोडलेला आहे) अधिक तपशीलासह आरेखित करण्यात आले आहे आणि ते मानीव वितरण परवानाधारकाने आयोगाकडे जमा केले आहे. त्यानुसार वीज पुरवठ्याच्या क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :—

" रायगड जिल्ह्यातील तळेगाव आणि पन्शील-खालापूर आणि भोकरपाडा गावातील १३९.८३ हेक्टर्सचे क्षेत्र. "

४.२ अधिनियमातील तरतुदींनुसार जनतेला सर्व उद्देशांसाठी विजेचा पुरवठा करण्याकरिता मानीव वितरण परवानाधारकाला प्राधिकृत करण्यात आले आहे.

५. **परवान्याची मुदत.—**सदर परवाना, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय यांनी विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ अंतर्गत, दिनांक १९ फेब्रुवारी २००९ रोजी निर्गमित केलेल्या एसइझेड अधिसूचनेच्या दिनांकापासून पंचवीस (२५) वर्षांचा कालावधी किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीकरिता अंमलात राहील.

६. **विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी.—**या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर किंवा त्यानंतर लगेच, मानीव वितरण परवानाधारक त्याच्या विशिष्ट अटी व परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहणीकरिता उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करील.

७. **अखंडित विजेचा पुरवठा.—**मानीव वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात चोवीस (२४) तास अखंडित विजेचा पुरवठा करण्यासाठी व्यवस्था करील.


८. **दुरुस्ती करण्याचे अधिकार.—**आयोगाला, कोणत्याही वेळी, या विनियमातील कोणत्याही तरतुदीमध्ये दुरुस्ती करता येईल. या विनियमात केलेले कोणतेही बदल त्यासंबंधीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून लागू राहतील आणि ते बदल त्यानंतर त्यांच्या फक्त बदल केलेल्या स्वरुपातच अंमलात राहतील किंवा राहणार नाहीत, जसे असेल तसे.

९. **अडचणी दूर करण्याचे अधिकार.—**या विनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

**अश्वनी कुमार,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक १० एप्रिल, २०१४.

*Schedule I*


BARVAI BRIDGE
BARVAI
TALEGAON
PANSIL
BHOKARRADA
RIS
DHAN PHATA
MUMBAI PUNE HIGHWAY
LEGEND:
SURVEY/GAT NUMBERS IN VILLAGE -TALEGAON,PANSHIL,BHOKARPADA, AS PER SEZ APPLICATION LIST AND ACQUIRED